महाराष्ट्र पोलीस

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल. बी. एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ २०२ /२०२३ दि. ३० /१२/२०२३

## 'वाहतूक नियंत्रण अधिसुचना'

**ज्याअर्थी, विठ्ठलवाडी** वाहतूक उपविभागाचे हद्दीत उसाटणे–नाऱ्हाणे फाटा, तळोजा एमआयडीसी रोड, ता. अंबरनाथ, जि. ठाणे या ठिकाणी दि. ०२/०१/२०२४ ते दि. ०९/०१/२०२४ या कालावधीत **'राज्य स्तरीय अखंड हरिनाम सप्ताह'** व **'दिंडी सोहळा'** साजरा करण्यात येणार आहे. सदर ठिकाणी जड अवजड वाहनांची मोठया प्रमाणात वर्दळ असते. त्यामुळे नमूद कालावधीत सदर रस्ता वाहतुकीस बंद करण्यात येणार असल्याने सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये, वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी, **डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) जे.एन.पी.टी./कळंबोली, नवी मुंबई, तळोजा एम.आय.डी.सी. कडून उसाटणे मार्गे खोणी, कल्याण, डोंबिवली, उल्हासनगर, अंबरनाथ, बदलापूर कडे जाणाऱ्या जड, अवजड वाहनांना **सकाळी ०५:०० ते रात्रौ २३:०० वाजेपावेतो नावडे फाटा, नवी मुंबई** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने रसायनी, कर्जत, नेरळ, बदलापूर मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) कल्याण, डोंबिवली, उल्हासनगर, बदलापूर कडून खोणी, उसाटणे मार्गे जे.एन.पी.टी./कळंबोली, नवी मुंबई, तळोजा एम.आय.डी.सी. कडे जाणाऱ्या जड–अवजड वाहनांना **सकाळी ०५:०० ते रात्रौ २३:०० वाजेपावेतो खोणी फाटा, निसर्ग हॉटेल समोर 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने खोणी येथून डावीकडे वळण न घेता सरळ जावून काटई नाका येथून डावे वळण घेवून कल्याण फाटा/ शिळफाटा मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना दि. ०२/०१/२०२४ ते दि. ०९/०१/२०२४ रोजीपर्यंत **'राज्य स्तरीय अखंड हरिनाम सप्ताह'** व **'दिंडी सोहळा'** संपेपर्यंत अंमलात राहील.

सदर वाहतूक अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

**( डॉ. विनयकुमार मे. राठोड )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, ठाणे शहर.

मा. आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर.
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मुख्याधिकारी, अंबरनाथ नगर परिषद.

**प्रत कार्यवाहीसाठी :—**
उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, कल्याण/विठ्ठलवाडी.
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ—४ उल्हासनगर व विशेष शाखा, ठाणे

**प्रत** :— पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/— सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत** :— समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/— सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :— सपोआ वाहतूक विभाग, उल्हासनगर व सर्व संबंधीत प्रभारी अधिकारी, वाहतूक उप विभाग.
२/— म.न.पा. उल्हासनगर च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक ठिकाणी सुचना फलक लावून घ्यावीत.